**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

---

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ११.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात अपीलकर्ता श्री. प्रमोद लक्ष्मणराव रणवरे, रा. मु.पो.निमसाखर, ता.इंदापूर, जि.पुणे यांच्या खालील अपिलाचा समावेश होता :

| | |
|---|---|
| अपील क्रमांक | ५६९/ पुणे / २००८ |
| जन माहिती अधिकारी | सचिव, कृषि विकास प्रतिष्ठान, शारदानगर, बारामती, ता.बारामती जि. पुणे |
| अपिलीय प्राधिकारी | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे |

| मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | चर्चेतील एकमताचा निष्कर्ष |
|---|---|
| शारदाबाई पवार विद्यानिकेतन शारदानगर, बारामती या शाळेच्या सर्व तुकड्यांची मान्यता पत्रे, अनुदानित व विनाअनुदानित इत्यादी सहा अनुषंगिक मुद्दे | अपीलकर्ता श्री. प्रमोद लक्ष्मण रणवरे यांनी मागणी केल्यानुसार शाळेकडे उपलब्ध असलेली माहिती दिली आहे. अजून मागणी केलेल्या माहितीसाठी शाळेतील रेकॉर्ड दाखवले जाईल व त्यातील आवश्यक ती माहिती उपलब्ध करून दिली जाईल, असे जन माहिती अधिकारी तथा संस्था प्रतिनिधी डॉ. अशोक आबा देवीकर यांनी प्रपत्रामध्ये नमूद केले आहे.<br>तथापि श्री. रणवरे उपरोक्तनुसार आवश्यक ती कागदपत्रे निरीक्षणासाठी आली नसल्याचे संस्थेच्या सचिव डॉ.सुनंदा पवार यांनी त्यांचे पत्र दि. २३.६.२००८ व दि. २४.७.२००९ अन्वये आयोगास अवगत केलेले आहे. त्याचप्रमाणे दि. ३०.६.२००८ पर्यंत आवश्यक ती माहिती दिली नसल्याचे श्री. रणवरे यांनी त्यांचे दि.३०.६.२००८ चे पत्रान्वये आयोगास कळविले आहे. दि. २३ पासून रोज दोन तास पाहणी करून कागद -पत्रांच्या झेरॉक्स प्रती काढावयास लावल्या होत्या. परंतु आपल्याला माहिती दिलेली नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता श्री. रणवरे यांनी आदेश मिळाल्यापासून आठ दिवसांचे आत जन माहिती अधिकाऱ्यांशी संपर्क साधून /शाळेमध्ये जाऊन आवश्यक त्या कागदपत्रांची पाहणी करावी व त्यांना हवे असलेल्या कागदपत्रांच्या प्रतींची मागणी लेखी नोंदवावी. त्यानुसार आवश्यक त्या प्रती जन माहिती अधिकाऱ्यांनी सशुल्क उपलब्ध करून द्याव्यात.

३. जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचा पूर्तता अहवाल दि. २०.४.२००९ पर्यंत आयोगास सादर करावा.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २६.३.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ.क्र | अपील क्रमांक | ६३३ + ५९७ / पुणे / २००७ |
|---|---|---|
| १ | अपीलकर्ता | प्रा. संपत माधव त्रिभुवन<br>भिमार्थ, इंगळे नगर, सिध्दार्थ कॉलनी, वारजे नाका, पुणे-५२ |
| २ | जन माहिती अधिकारी | प्राचार्य, मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे-५ |
| ३ | अपिलीय प्राधिकारी | सचिव, मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे-५ |

## विवेचन

अपीलकर्ता प्रा. संपत माधव त्रिभूवन यांनी दि. २५.७.२००६ रोजीचे अर्जान्वये जन माहिती अधिकारी, मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे यांच्याकडे शैक्षणिक वर्ष सन १९९२-९३ ते २००५-०६ पर्यंत महाविद्यालयामधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या हजेरी पत्रकांची छायांकित प्रत मागितली आहे.

दि. १२.६.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपीलकर्त्याने माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले. मागणीपैकी सन २००३ पासूनची माहिती अपीलकर्त्यास दिली आहे. दहा वर्षापूर्वीचे रेकॉर्ड उपलब्ध नसल्याने सन १९९२-९३ पासूनची माहिती देता आली नाही. तसेच अपील क्र.५९७ मध्ये उपलब्ध असलेली सर्व कागदपत्रे दिली आहेत. असे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे यांनी सुनावणीत दि. १७.१२.२००८ रोजी नमूद केले. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेख निरीक्षणास उपलब्ध करून द्यावे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. ३०.३.२००९

( विजय कुंवळकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७३६/ पुणे | श्री. मधुकर भिमाजी चाबुकस्वार मु.काठाबुर बु. पो.लाखनगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे | निरीक्षक, सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालय, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-१ | सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालय, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-१ | आर्य समाज पुस्तकालय व मोफत वाचनालय, पिंपरी, पुणे या संस्थेबाबत एकूण ३३ मुद्दयांची माहिती | आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने दि. ४.८.२००८ रोजीच्या पत्रान्वये नमूद केले आहे. |
| २ | १२९८/ पुणे | श्री. रूपगिर लक्ष्मण गिरी द्वारा साई समर्थ हॉस्पिटल, नारायणगाव, ता.जुन्नर, जि. पुणे | जन माहिती अधिकारी, पुणे विद्यापीठ, पुणे | अपिलीय प्राधिकारी तथा प्रबंधक, पुणे विद्यापीठ, पुणे | सन २००३-२००६ या कालावधीतील सेट परीक्षेत नापास झालेल्या भटक्या विमुक्त जमातीच्या विद्यार्थ्यांचा तपशील | विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार एस.सी. विद्यार्थ्यांना सवलती मिळू शकतात. परंतु एन.टी.या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना याबाबत सवलती मिळू शकत नाही. तसेच सेट परीक्षेत गुण देणे अभिप्रेत नाही. तसेच नापास झालेल्या विद्यार्थ्यांच्या नावांची वेगळी यादी तयार केली जात नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | २०६४/ पुणे | श्री. गुलाब सिताराम जाधव रा.वाकी खुर्द, ता.राजगुरूनगर जि. पुणे | निवासी नायब तहसीलदार, राजगुरूनगर, ता. राजगुरूनगर जि. पुणे | तहसीलदार, राजगुरूनगर, ता. राजगुरूनगर जि. पुणे | मौजे वाकी खुर्द राजगुरूनगर येथील पोकळस्थ / खोटी आणेवारी रद्द करणे, कुळखंड सदरी वहिवाटीने नाव दाखल करणे | मागणी प्रशासकीय कार्यवाहीशी निगडीत आहे. याचा समावेश माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| ४ | ११९६/ पुणे | श्री.यशवंत कृ.देशपांडे ३६०/ब, शनिवार पेठ, श्री. जी. सह गृहरचना संस्था मर्या., फ्लॅट नं.८, १ला मजला, पुणे | विभागीय वहातूक अधिकारी, महाराष्ट राज्य मार्ग परिवहन महामंडळ, विाागीय कार्यालय, शंकरशेठ रस्ता, पुणे-३७ | विभाग नियंत्रक महाराष्ट राज्य मार्ग परिवहन महामंडळ, विाागीय कार्यालय, शंकरशेठ रस्ता, पुणे-३७ | सन १९७४ ते १९८९ या कालावधीत स्वारगेट व शिवाजीनगर येथे पी.सी. ओ.बूथ कोणत्या तत्वावर व तरतुदीनुसार देण्यात आले याबाबत, तसेच सौ. सरला गजभीय यांना पी.सी.ओ. बूथ बाबत कारवाईची माहिती | अपीलकर्त्याला माहिती देण्यात आली आहे. प्रशासकीय कार्यवाहीच्या मागणीचा समावेश माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| ५ | २६५४/ पुणे | श्री.राजकुमार श्रीपाल पाटीलन रा. ३, रथचक्र अपार्टमेंट, तेजसनगर, कोथरूड, पुणे-३८ | सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.१, पुणे शहर, पुणे | सह जिल्हा निबंधक (वर्ग-१) व मुद्रांक जिल्हाधिकारी पुणे शहर यांचे कार्यालय, ५,फायनान्स रोड, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय इमारत, १ला मजला, पुणे१ | घर नं.४९५/०६, शनिवार पेठ, पुणे शहर, मंत्री हाईट्स, बिल्डिंग डी इमारतीतील दुकान ४ बाबत दि. १६.११.१९९० रोजी केलेला दस्त क्र.१४३३८/९० मिळणेबाबत | आवश्यक ती माहिती २० दिवसांत देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. मात्र अशा दस्ताच्या मागणीसाठी स्वतंत्र नियमावलीनुसार अपीलकर्त्याने कार्यवाही करणे अपेक्षित आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. वरील तक्त्यात नमूद केलेली अनु. क्र. १ ते ५ अपिले (क्र. ७३६, १२९८, २०६४,११९६, २६५४) निकाली काढण्यात येत आहेत.

२. विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयतांमध्ये एकमत झाले आहे, असे अपील क्र.२६५४ मध्ये नमूद केले आहे. त्यानुसार पूर्तता करून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. याची पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

पुणे
दि. २०.३.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

सौ.विमल बाळकृष्ण गिरमे
श्री तुकाई निवास, जोशीवाडी, शिरुर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त व प्रादेशिक संचालक,
नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
नगरपरिषद, शिरुर, ता.शिरुर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८१७ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्त्या** सौ.विमल बाळकृष्ण गिरमे
श्री तुकाई निवास, जोशीवाडी, शिरुर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त व प्रादेशिक संचालक,
नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे श्री.प.सं.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
नगरपरिषद, शिरुर, ता.शिरुर, जि.पुणे श्री.एस.एस.कापरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>१. गुंठेवारी विकास अधिनियम अंतर्गत बांधकाम नियमित करण्याविषयी सादर केलेले प्रकरण मंजूर झाले आहे काय? २. असल्यास मला का कळविण्यात आले नाही? ३. मंजूर केले नसल्यास ५४ महिन्यांचा प्रदीर्घ विलंब का? ४. केव्हा मंजूर होईल तसे केव्हा कळविण्यात येईल? | |

## विवेचन

गुंठेवारी अधिनियमित करण्यासाठी ऑगस्ट २००२ मध्ये मुख्याधिकारी, नगरपरिषद, शिरुर यांच्याकडे प्रकरण मंजुरीसाठी सादर केले होते. परंतु त्या संदर्भातील मंजुरीही मिळत नाही व माहितीही दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्त्या सौ.विमल बाळकृष्ण गिरमे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात नोंदविली आहे.

राज्य माहिती आयोगाने दि.२४.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. त्यावेळी उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्यामुळे सदरचे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

गुंठेवारी अधिनियमित करण्यासाठी सौ.गिरमे यांनी दि.५.८.२००२ रोजी अर्ज केला होता. त्याबाबत दोन स्मरणपत्रे त्यांनी पाठविली, तरीही समाधानकारक उत्तर न मिळाल्यामुळे दि.२८.२.२००७ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज केला. प्रकरण केव्हा मंजूर होईल व मला तसे केव्हा कळविण्यात येईल, मंजूर केले नसल्यास विलंब का लागला, अशा स्वरुपाची विचारणा सौ.गिरमे यांनी या अर्जात केली आहे. खुलासा-विचारणा कायद्याच्या कक्षेत येत नसल्याचे नमूद करुन अन्य मुद्यांची माहिती दिली, असे जन माहिती अधिकारी श्री.एस.एस.कापरे यांनी सांगितले. सौ.गिरमे यानी प्रथम अपील न करता राज्य माहिती आयोगाकडे अपील केले असल्याचे अपिलीय

प्राधिकारी श्री.प.सं.पाटील यांनी निदर्शनास आणले. सौ.गिरमे यांच्या अर्जात असलेल्या त्रुटींबाबत त्यांना यापूर्वीही कळविण्यात आले असून अगदी अलीकडे म्हणजे दि.९.३.२००९ रोजी कळविले आहे व त्याबाबतची पूर्तता आठ दिवसात करण्यास त्यांना मुदत दिलेली आहे, असे त्यांनी पूरक कागदपत्रांसह निवेदन केले. मात्र या काळात चार दिवस शासकीय कार्यालयांना सुट्टी असून याच काळात आपल्या मुलीचे लग्न असल्याचे नमूद करुन दि.९.४.२००९ पर्यंतची मुदत सौ.गिरमे यांनी मागितली आहे. सौ.गिरमे यांनी मूळ अर्ज सादर केल्याला सहा वर्षे उलटून गेलेली आहेत व त्रुटींची पूर्तता करण्याबाबत आता नेमकेपणाने कळविले जात आहे, हे नगरपरिषदेच्या कारभारातील काळकाढूपणाचे निदर्शक आहे. बांधकाम नियमित करण्याबाबतच्या आवश्यक कागदपत्रांची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ अन्वये सर्व नागरिकांसाठी उपलब्ध असली पाहिजे व केलेल्या कार्यवाहीचीही माहिती अर्जदाराला त्वरित मिळाली पाहिजे, याची समज मुख्याधिकारी, शिरुर नगरपरिषद, जि.पुणे श्री.एस.एस.कापरे यांना देण्यात येत आहे.

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे श्री.प.सं.पाटील यांनी त्यांच्या कक्षेतील सर्व नगरपरिषदांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ अन्वये केलेल्या अंमलबजावणीचा आढावा घेऊन आयोगाला २५.४.२००९ पर्यंत अहवाल सादर करावा.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२०.३.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सिद्राम नागप्पा बनसोडे — अपीलकर्ता
द्वारा मातोश्री मालनबाई आप्पाराव
कस्तुरे हायस्कूल, (हिंदी माध्यम ),
७२२, शुक्रवार पेठ, सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा — उत्तरवादी
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष,
सोलापूर जिल्हा माध्यमिक शाळा
शिक्षकेतर सेवक सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर
जुनी पोलीस लाईन, निराळे वस्ती रोड, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.६.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सिद्राम नागप्पा बनसोडे, द्वारा मातोश्री मालनबाई आप्पाराव, कस्तुरे हायस्कूल, (हिंदी माध्यम ), ७२२, शुक्रवार पेठ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर
श्री. अशोक भांडवलकर

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष,
सोलापूर जिल्हा माध्यमिक शाळा शिक्षकेतर सेवक सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर, जुनी पोलीस लाईन, निराळे वस्ती रोड, सोलापूर
श्री. सुरेश रामचंद्र पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.३.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.४.२००६ |
| ६ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.३.२००६ |

७ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोलापूर जिल्हा माध्यमिक शाळा शिक्षकेतर सेवक सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर या संस्थेकडून आपण कर्ज घेतलेले नसताना एक लाख रुपये कर्ज आपल्या नावावर दाखविले असून त्या संदर्भातील कर्ज मागणीचा अर्ज व इतर अनुषंगिक सर्व माहिती

## विवेचन

सोलापूर जिल्हा माध्यमिक शाळा शिक्षकेतर सेवक सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर या संस्थेकडून आपण कर्ज घेतलेले नसताना एक लाख रुपये कर्ज आपल्या नावावर दाखविले असून त्या संदर्भातील कर्ज मागणीच्या अर्जांपासून विविध प्रकारची माहिती मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. सिद्राम नागप्पा बनसोडे (शिपाई) यांनी जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, सोलापूर जिल्हा माध्यमिक शाळा शिक्षकेतर सेवक सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर यांच्याकडे केली होती. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ आपल्या संस्थेला लागू होत नाही, असे नमूद करुन जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष यांनी माहिती नाकारली. याच कारणावरुन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांनी श्री. बनसोडे यांचे अपील नाकारले, म्हणून श्री. बनसोडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यामध्येही पत संस्थेचे व अपिलीय प्राधिकारी यांच्या प्रतीनिधींनी हीच भूमिका नमूद केली. अपीलकर्ता उपस्थित नसल्यामुळे अपिलाची सुनावणी लावण्यात आली.

श्री. बनसोडे यांना पत संस्थेने दि. २४.४.२००४ रोजी रुपये एक लाख कर्ज दिलेले आहे. सप्टेंबर २००३ पासून त्यांनी त्याचे हप्ते भरलेले नाहीत. मूळ कर्ज रु.१,०६,९००/- व त्यावरील व्याज रु. ७३,४८४/- रुपये असे एकूण रु. १,८०,३८४/- रुपये बाकी आहेत. कर्ज व व्याज ही रक्कम जमा केल्यानंतर त्यांना सर्व माहिती देण्यात येईल, असे पत संस्थेचे अध्यक्ष श्री. सुरेश रामचंद्र पाटील यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले असून श्री. बनसोडे यांच्या नावे असलेल्या

कर्जाचा उतारा सोबत जोडला आहे. श्री. बनसोडे यांच्याकडील कर्ज वसुलीसाठी संस्थेने त्यांच्याविरुध्द सहकारी न्यायालयात दावा दाखल केला आहे, असे श्री. पाटील यांनी नमूद केले आहे, 'तर बनावट कागदपत्रे तयार करून एक लाखाचे कर्ज दाखवून आपली फसवणूक करण्यात आली आहे, त्याविरूध्द आपण न्यायालयात दावा दाखल केला आहे,' असे श्री. बनसोडे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

पत संस्थेला सरकारचे अनुदान अथवा अन्य भांडवल दिले नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही, असे संस्थेचे अध्यक्ष श्री. सुरेश रामचंद्र पाटील व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री. बी.एस. यमपल्ले यांचे प्रतिपादन आहे. मात्र पतपेढीवर सहकार कायद्याचे नियंत्रण असल्याने माहिती द्यावी लागेल, असे विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था श्री. अशोक भांडवलकर यांनी नमूद केले. श्री. बनसोडे यांनी मागितलेली माहिती ७ दिवसात देण्यांत येईल, असे जन माहिती अधिकारी तथा पतसंस्थेचे अध्यक्ष श्री. सुरेश रामचंद्र पाटील यांनी कबूल केले.

आयोगाकडील सुनावणीत कबूल केल्यानुसार पत संस्थेचे अध्यक्ष श्री. सुरेश रामचंद्र पाटील यांनी दि. १८.६.२००८ रोजी श्री. बनसोडे यांना संस्थेच्या कार्यालयात येऊन माहिती घेऊन जाण्यास कळविले. मात्र श्री. बनसोडे यांनी माहिती नेली की नाही, याबाबतचा खुलासा संस्थेकडून प्राप्त झाला नसल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांनी दि. ३०.३.२००९ रोजीच्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे. माहिती प्राप्त झाली किंवा नाही याबाबत अपीलकर्त्यांने काहीही कळविलेले नाही. माहिती घेऊन जाण्याबाबत संस्थेने कळविलेले असल्यामुळे अपीलकर्त्याची तक्रार राहण्याचे कारण नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३०.३.२००९